# स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमाला

वार्षिक अहवाल शै. वर्ष २०१९—२०

- शै. वर्ष २०१९—२० मध्ये स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमालेंचे १८ वे पुष्प आयोजनासंबंधी प्राचार्य डॉ. राम वाघ सर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यामध्ये प्रमुख मार्गदर्शकासंबंधी चर्चा करण्यात आली. सर्वानुमते प्रसिध्द पत्रकार व कवी श्री. शामसुंदर सोन्नर, मुंबई यांना निमंत्रित करण्याचे ठरले.

- कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमालेचे १८ वे पुष्प दि.०८.०२.२०२० रोजी गुंफण्यात आले. **''भारतीय संविधान मुल्ये आणि आजचा युवक''** या विषयावर प्रसिध्द पत्रकार व कवी श्री. शामसुंदर सोन्नर, मुंबई यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम वाघ हे होते. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. रणजित जाधव यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्याख्यानमालेचे प्रभारी प्रा. डॉ. शाहुराज मुळे यांनी केले तर आभार प्रा. शिवाजी कोरे यांनी मानले. या कार्यक्रमास संस्थेचे माजी सचिव मा.श्री.शहाजीराव मुळे, विद्यमान सचिव मा.श्री.शामराव देशमुख, कोषाध्यक्ष मा. श्री नरसिंह देशमुख, संचालक मा. श्री भिमराव शिंदे, श्रीमती सुवर्णा मुळे, मा.श्री.सुर्यकांत देशमुख, मा. श्री आयुब शेख, मानद संचालक मा.श्री.डॉ.सोपानजी जटाळ, व्याख्यानमालेचे सदस्य प्रा. डॉ. वैशाली माढेकर, तसेच अनेक प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा—यांची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमात प्रमूख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वार्षिक बक्षीस, प्रमाणपत्रे व पुरस्कारांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले.

- फोटो व बातमी















## देशमुख महाविद्यालयात व्याख्यान

**लातूर / प्रतिनिधी**

लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील कै व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात शनिवारी (दि.८) सकाळी १०.३० वा. विलासदीप रौप्यमहोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन, स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमाला पुष्प १८ वे आणि पारितोषिक वितरण सोहळा आयोजित केला आहे. यावेळी पत्रकार शामसुंदर सोन्नर यांचे 'भारतीय संविधान मूल्ये आणि आजचा युवक' या विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी माजी मंत्री दिलीपराव देशमुख राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून ओमप्रकाश पाटील, महादेव जटाळ, भीमराव शिंदे, अयुब शेख, नरसिंह देशमुख, सुवर्णा मुळे, सूर्यकांत देशमुख, मारुती मस्के व डॉ. सोपानराव जटाळ आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव शामराव देशमुख आणि प्राचार्य डॉ. राम वाघ यांनी केले आहे.

▶ 'विलासदीप' विशेषांकाचे प्रकाशन ▶ कै व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव

## भारतीय संविधान मानवमुक्तीचा बीजग्रंथ

**लातूर :** अमेरिकाच नव्हे तर संपूर्ण जगात भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ आहे. खरे तर भारतीय संविधान हे मानवमुक्तीचा बीजग्रंथच आहे त्यामुळे प्रत्येक भारतीयांनी संविधानाचा आदर करणे आवश्यक आहे., असे प्रतिपादन प्रसिद्ध पत्रकार व कवी शामसुंदर सोन्नर यांनी केले.



दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगावद्वारा संचलित बाभळगाव येथील कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाच्या वतीने 'विलासदीप' रौप्य महोत्सवी विशेषांक प्रकाशन सोहळा व समारोप समारंभ स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमाला पुष्प-१८ वे आणि पारितोषिक वितरण समारंभ दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी 'भारतीय संविधान मूल्ये आणि आजचा युवक' या विषयावर सोन्नर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राम वाघ होते. या वेळी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शामराव देशमुख, डॉ. सोपानराव जटाळ, कोषाध्यक्ष नरसिंह देशमुख, सुवर्णा मुळे, सूर्यकांत देशमुख, आयुब शेख, ब्रिजमोहन कदम-पाटील, ॲड. व्यंकट नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी 'विलासदीप' विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

एक मत, एक अधिकार ही खूप मोठी देणगी संविधानामुळे भारतीयांना मिळाली, असे नमूद करून सोन्नर पुढे म्हणाले की, भारतातील श्रीमंत असो की, गरीब, उच्च पदस्थ असो की, मजूर या सर्वांना संविधानाने समान हक्क आणि अधिकार दिलेले आहेत. आजच्या युवकांनी संविधानाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण भारतीय संविधानावर पाश्चात्य युवकांनी सखोल अभ्यास केला आहे. अनेकांनी त्यावर पीएच. डी.सुद्धा केली आहे. संविधान हक्कांबाबत जागृत करते तसेच कर्तव्याविषयीही सांगते, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमात हर्षदा सावंत, नुजहत शेख, सना काझी यांनी मिळविलेल्या विशेष प्राविण्याबद्दल त्यांचा पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. शाहुराज मुळे यांनी केले तर संपादकीय भूमिका डॉ. रणजीत जाधव यांनी विषद केली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. वैशाली मोढेकर, डॉ. जयदेवी पवार, डॉ. अजित भांजी, प्रा. जाधव, बाळासाहेब देशमुख, प्रा. सोपान डोपे, डॉ. अंगद कोरे, डॉ. नरेंद्र देशमुख, प्रा. शंकर माने, प्रा. हरिहर गायके, बालाजी देशमुख, बाबा पाटील, अंकुश धडकर, दत्ता फुलगामे यांनी सहकार्य केले. प्रा. शिवाजी कोरे यांनी आभार मानले.कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. डॉ. शाहुराज मुळे,
प्रभारी
स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमाला